वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शुक्रवार दि. १५ नोव्हेंबर २०२४ पाने ४ किंमत ३

# खुद गंद्दी सियासत के कदमो मे पडे है, और सोच रहे है की, हम ही सबसे बडे है
# गद्दारे नबी है वो मुसलमान यकीनन, गुस्ताखे नबी के जो हिमायत मे खडे है

कौन कहेता है समाज के ये लिडर जमाने के लिए जिंदा है
ये तो सियासत मे पैसे कमाने के लिए जिंदा है
इनसे कुछ अच्छी तव्खो कोई हरगीज ना रखे
कौम को बेचने के लिए ये सियासत मे जिंदा है

दिव्य वार्ता

## भाजपवाले म्हणतात आमचा संकल्प हिंदू राष्ट्र आहे, ज्यांना मान्य नाही त्यांनी पाकिस्तानात जावे असे म्हणणाऱ्या युवराजच्या महायुतीला आपण मतदान करणार का?

# समाजाचे पाक लिडरांचे नापाक कारणामे

## रामगिरी महाराजची पाठराखण करणारे महायुतीसोबत जुळून घेवू लागले

- बीडच्या त्या युवराज साठी आता वाजतेय धोक्याची घंटी
- मतदार सांगताहेत ३५ वर्षात कोणता विकास केला?
- अमित शहा भर सभेत म्हणतात, गॅरंटीके साथ वक्फ बोर्ड बरखास्त किया जायेगा
- समाज बांधवानो राज्यात महायुतीचे सरकार येवू नये यासाठी मतदान करा

## राज्यात महायुतीचे सरकार आले तर समान नागरी कायदा लागणार?

३५ वर्षाच्या इतिहासात मुस्लिम लिडरशिपचे वाटोळे करणाऱ्यांच्या युवराज ला मुस्लिम मतदार कदापी मतदान करणार नाहीत

बिकाऊ पुढाऱ्यांच्या भयकाव्यात न येता धर्मगुरुंनी सांगितलेल्या उमेदवारालाच मतदान करा

# जरांगे पाटलांच्या टिमचा अनिलदादांना पाठींबा

## संदीप क्षीरसागर vs अनिलदादा जगताप मध्ये होणार तगडी फाइट

- एकतर्फी वाटणाऱ्या निवडणूकीत आली आता मोठी चुरस
- आज अनिल जगतापांना अनेकांनी दिला पाठींबा
- कालच मराठा सेवकांनी दिला होता दादांना पाठींबा



बीड, (दिव्य न्युज):- २० तारखेच्या होणाऱ्या मतदानासाठी मतदारांसह संपूर्ण यंत्रणा सज्ज असून २० तारखेला बीडचा आमदार कोण होणार? याचा फैसला होणार असून या टाकलेल्या मतदानाचा निकाल २३ तारखेला येईल आणि बीडचा ५ वर्षाचा पुढील आमदार कोण होईल याचा निकाल लागेल. गेल्या आठ दहा दिवसापासून बीड विधानसभा मतदार संघात प्रचाराचा जोर सुरू असून प्रत्येक उमेदवार आप आपल्या परिणे प्रचार करत आहेत. या निवडणूकीत दोन्ही राष्ट्रवादीचे दोन उमेदवारांसह तीन अपक्षामध्ये मुख्य लढत होणार आहे. या सह इतर काही अपक्ष उमेदवारही आपले नशीब आजमावत आहेत. काल पर्यंत एकतर्फी वाटणारी ही निवडणूक काल रात्री पासून अचानक चुरस वाढली. काल पर्यंत या दोघांभावातच मुख्य लढत होते की काय असे चित्र होते. काल मराठा समन्वयकांनी बैठक घेवून जरांगे पाटलांकडून आपला एकमुखी पाठींबा अनिलदादांच्या पारड्यात टाकल्यानंतर बीड विधानसभेमध्ये वेगळी हवा निर्माण झाली. मुख्य लढतीपासून काहींसे लांब असलेले अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप हे जोरदार लढतीमध्ये सहभागी झाले आणि मतदारांचा कौल पाहता शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार विद्यमान आ.संदीप क्षीरसागर आणि अनिलदादा जगताप यांच्यामध्ये मुख्य लढत होईल असे काहींसे चित्र मतदार संघात निर्माण झाले असून येणाऱ्या २० तारखेला मतदान झाल्यानंतर २३ तारखेलाच कळेल की बीडचा पुढील आमदार कोण. रात्रीपासून अनिल जगताप यांना पाठींबा देणाऱ्याची संख्या वाढली असून मराठा समन्वयकांनी पाठींबा दिल्यानंतर शहरातील अनेक मतदारांनी अनिल जगताप यांची भेट घेवून त्यांना आपला पाठींबा दिला आहे.





# पोलीस अधीक्षकांच्या पथकाचा जुगाऱ्यांना दणका

## दहा जणांना रंगेहाथ पकडले, ४८ लाखांचा मुद्देमाल जप्त

बीड, (दिव्य न्युज):-बीड, पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांच्या पथकाने जुगाऱ्यांना मोठा दणका दिला आहे, पोलीस अधीक्षक पथकाचे बाळराजे दराडे यांनी गेवराई परिसरातील हॉटेल तोरणा च्या पाठीमागे उदय पानखडे यांच्या मालकीच्या एका पत्र्याच्या शेडमध्ये सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर रात्री पावणे अकराच्या सुमारास छापेमारी केली, यावेळी जुगार खेळताना बाळूनाथ मोहन मोटे, दीपक वामनराव सोनवणे, अमोल दत्तात्रय गांडुळे, श्याम बाबुराव चव्हाण, बाळू पापा राठोड, वचिष्ठ भिमराव ठोसर, कपिल भास्कर मुंजे, ज्ञानेश्वर सूर्यकांत लांडगे, पोपट छगन दाभाडे, गणेश गोरख, दावडकर या दहा जणांना पकडले, यावेळी पान २ वर



# लिंबागणेश महावितरण उपकेंद्राला कर्मचाऱ्याचा अभाव...!

## अभियंता पद रिक्त असल्याने होतात अडचणी..

लिंबागणेश, (दिव्य न्युज):- तालुक्यातील लिंबागणेश ३३ केवी महावितरण उपकेंद्रात अजब कारभार पाहायला मिळत आहे. जिल्हा परिषद सर्कल चे असणारे गाव मात्र उपअभियंता हलकुडे यांची बदली झाल्यापासून लिंबागणेश येथील चार्ज हा कोणाकडे आहे हे काही कळेना झाले असुन वरिष्ठ अधिकाऱ्यांचें लिंबागणेश कडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास येत आहे. लिंबागणेश ३३ केव्ही उपकेंद्रात कर्मचारी कोणीही वेळेवर हजर नसतात.ग्रामीण ▶▶ पान २ वर

# जनतेच्या मनावर आ.संदीप क्षीरसागरांचे गारूड

## विकासकामे मार्गी लागल्याने बीड मतदार संघातील जनता संदीपभैय्या सोबतच

बीड,(दिव्य न्युज):- बीड मतदारसंघात मागील पाच वर्षात केलेली विकासकामे जनतेला आवडली. त्यातून विश्वासार्हता वाढली अन् याच विश्वासातून आ. संदीप क्षीरसागर यांनी जनतेच्या मनावर गारुड केले. लोकांची कामे सहज कशी मार्गी लागतील यासाठी त्यांनी कायम आपली संपर्क अन् संवाद यंत्रणा सजग ठेवली. बीड मतदार संघाचा चेहरा मोहरा बदलण्याचे काम झाले. सिंचन प्रकल्प, रस्ते विकास, आरोग्य, वीज हे सर्व प्रश्न सोडवण्यासाठी भरीव काम केले. विकासकामे मार्गी लागल्याने जनता या निवडणूकीत संदीप भैय्या सोबत आहे. त्यामुळे आपण सर्वांनीही आ. संदीप क्षीरसागर यांना पुन्हा एकदा प्रचंड बहुमतांनी विजयी करा असे आवाहन माजी आ. सय्यद सलीम यांनी केले.

बीड मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष व महाविकास आघाडी व मित्रपक्षाचे अधिकृत उमेदवार संदीप क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ आयोजीत मतदार संवाद बैठकीत ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर आ. संदीप क्षीरसागर, व इतर प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. माजी आ. सय्यद सलीम म्हणाले, आमदार म्हणून मी पण या मतदारसंघात काम केले आहे. लोकांचे प्रश्न अनेक असतात. ते संयमाने ऐकून घेवून समजून घ्यावे लागतात. जनतेला शब्द देताना खूप विचार करावा लागतो, मूळात तो प्रश्न लोकप्रतिनिधीला समजला पाहिजे. त्यासाठी प्रश्न सोडवण्याची जाण असावी लागते. आ. संदीप क्षीरसागर यांच्यात हे सर्व गुण आहेत. जनतेचे प्रश्न सोडवताना ▶▶ पान २ वर



### मुस्लिम मतदार गमावण्याची भीती... अजित पवार, पंकजा मुंडे, अशोक चव्हाण भाजपच्या घोषणेशी असहमत

# बटेंगे तो कटेंगे : युतीत कुणाचा हुंकार, कुणाचा नकार

प्रतिनिधी | मुंबई

हिंदू व्होटबँक भाजपकडे एकसंघ ठेवण्यासाठी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी महाराष्ट्रात येऊन 'बटेंगे तो कटेंगे'चा नारा दिला. दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही घोषणा जरा सकारात्मक रीतीने मांडून 'एक हैं तो सेफ हैं'चा नारा दिला. आता भाजप नेते सोयीनुसार वेगवेगळ्या ठिकाणी या घोषणांचा वापर करत आहेत. मात्र मुस्लिम मतदारांवर विजयाचे गणित अवलंबून असलेल्या महायुतीच्या काही नेत्यांनी मात्र 'बटेंगे तो कटेंगे' या घोषणेला विरोध केला आहे. यात राष्ट्रवादीचे अजित पवार, भाजपचे नेते, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे या दिग्गज नेत्यांचा समावेश आहे.

**अजित पवार • महाराष्ट्रात अशा घोषणा कदापिही चालणार नाहीत**

'फुले, शाहू, आंबेडकरांच्या या महाराष्ट्रात 'बटेंगे कटेंगे' अशा घोषणा चालणार नाहीत. इथल्या लोकांनी नेहमीच जातीय सलोखा ठेवला आहे. बाहेरचे लोक आपल्या राज्यात येतात, त्यांचा विचार बोलून दाखवतात. मात्र महाराष्ट्रातील जनता अशा घोषणा कदापिही स्वीकारणार नाही. आजवरच्या निवडणुकांचा हा इतिहास आहे.

कारण : मुस्लिम समाज राष्ट्रवादीचा मतदार आहे. त्यांच्या पक्षाने ४ उमेदवार मुस्लिम समाजाचे दिलेत. त्यांची नाराजी नको म्हणून..

**पंकजा मुंडे • असा विषय महाराष्ट्रात चालणार नाही, सर्वांना सोबत घेऊन जावे**

राजकारण वेगळे आहे. मी भाजपची आहे म्हणून मी या घोषणेचे कधीच समर्थन करणार नाही. विकासाच्या मुद्द्यावर राजकारण झाले पाहिजे, असे माझे स्पष्ट मत आहे. सर्व नागरिकांना सोबत घेऊन काम सर्वच नेत्यांनी करणे अपेक्षित आहे. त्यामुळे असा कोणताही विषय महाराष्ट्रात आणण्याची गरज आहे असे मला वाटत नाही.

कारण : बीड जिल्ह्यातील २ लाख, परळीत ४० हजार मुस्लिम मतदारांना नाराज करणे मुंडे बंधू-भगिनींना परवडणारे नाही.

**अशोक चव्हाण • कुणाच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत हे पाहावे**

मी भाजपत असलो तरी सेक्युलर हिंदू आहे. 'बटेंगे तो कटेंगे' ही घोषणा पूर्णपणे अप्रासंगिक असून महाराष्ट्रातील जनतेला ते आवडणार नाही. निवडणुकीच्या काळात घोषणाबाजी केली जाते. व्यक्तिशः मी अशा घोषणांच्या विरोधात आहे. यातून कुणाच्याही भावना दुखावल्या जाऊ नयेत, हे आम्हाला सर्वांनाच पाहावे लागेल.

कारण : नांदेड जिल्ह्यात ५ लाख तर भोकरमध्ये ३५ हजार मतदार. बहुतांश वर्ग काँग्रेसमध्ये असल्यापासून चव्हाणांना मानणारा.

**संविधान बदलाचे नरेटिव्ह सेट करणाऱ्यांना हे उत्तर : फडणवीस**

राज्यात महायुतीला अनुकूल वातावरण आहे. 'बटेंगे तो कटेंगे' हे फक्त काउंटर नरेटिव्ह आहे. लोकसभेच्या वेळी विरोधकांनी संविधान बदलणार यासारखा अपप्रचार करून मतदारांची दिशाभूल केली. त्याला प्रत्युत्तर म्हणून ही घोषणा आणली आहे. काही लोक 'लाडकी बहीण' यासारख्या लाभदायी योजनांवर चर्चा करत नाहीत, पण अशा मुद्द्यांवर तासन्‌तास चर्चा करतात, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'दिव्य मराठी'ला दिली.

# मराठा आरक्षणासाठी आणखी एका तरुणाची आत्महत्या

बीड (दिव्य न्युज):- चांगले मार्क मिळूनही केवळ आरक्षण नसल्यामुळे आपले आयटीचे स्वप्न पुर्ण होत नाही, हे पाहून नैराश्येतून एका २१ वर्षीय मराठा तरुणाने सविस्तर सुसाईड नोट लिहित गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना आज सकाळी शिरापूर (धुमाळ) येथे घडली. त्याची सुसाईड वाचून समाजातील विद्यार्थ्यांचे वास्तव जगासमोर आले. हे वास्तव मांडण्यासाठी तरुणांना आत्महत्या करावी लागते हे दुर्दैव.

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी एकीकडे सुरू असताना आज सकाळी पाटोदा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिरापूर धुमाळ येथील प्रवीण गोरख पिंगळे या २१ वर्षीय तरुणाने आज सकाळी मराठा आरक्षणाबाबतचे स्टेटस आपल्या मोबाईलवर ठेवले. ५ वा. ५८ मिनीटाला हे स्टेटस त्याने ठेवल्याचे दिसून आले. ६ वा. २० मि.ला त्याने आपल्या शेतातील एका झाडाला गळफास घेऊन आत्महत्याक`ली. दहावीला असताना आपले आयटीचे स्वप्न होते. १२ वीला ८० टक्के पडले. केवळ आरक्षण नसल्यामुळे आरि फिस भरायला पैसे नसल्यामुळे आपल्याला बीसीएस नर्सिंगला ॲडमिशन घ्यावे लागले. इथेही आरक्षणवाल्यांना फिस कमी आणि मराठ्यांना फिस जास्त हे दिसून आले. हे दुर्दैवी म्हणत, आपण आत्महत्या करत असल्याचे त्याने सांगितले. याबाबत कोणीही दोषी नसल्याचे त्याने चिठ्ठीत म्हटले परंतु या आत्महत्येने आणि त्याने लिहिलेल्या चिठ्ठीबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्या समाजातील वास्तव समोर आणत असल्याच्या प्रतिक्रिया समोर येत आहेत.



मी प्रवीण पिंगळे, स्वखुशीने हा निर्णय घेतला आहे, कदाचीत आरक्षण भेटलं असतं तर ही वेळ आली नसती. दहावी झाली की एक स्वप्न बघितलं होतं,की एक चांगला आयटी इंजिनिअर व्हायचं, बारावीला ८० टक्के मार्क भेटून पण कॉलेजची फिस दिड लाख अन् बाकीच्याला ६० टक्के पडून २० ते ३० हजार, वाईट वाटतं, ही तुमची योग्यता मार्क बघून नाही तर कास्ट बघून ठरवली आहे. आरक्षणाची किंमत तेव्हा समजते, जेव्हा कॉलेजला लाख लाख भरावे लागतात. मग खूप दिवस झाले होते. ॲडमिशन चालू होऊन खूप कॉलेजला कॉल केले. वाटलं, हे फिस कमी घेईन, ते घेईन पण सगळे सारखेच. वाट बघितली. कुणीबी भेटल परंतु नाही भेटलं. मग बीसीएस नर्सिंगचा फॉर्म भरला, नंबर पण लागला, सोपं नसतं, स्वत:ची डोळ्यासमोर राख होते. कॉलेज चालू होऊन दहा दिवस झाले, परंतु डोक्यात आयटीच येत होती. तिथं पण बाकीच्या कास्टची फिस दहा अन् वीस हजार आणि मराठा ऐंशी ते नव्वद हजार. माझ्या सोबतचे सगळे ते पण माझ्या पेक्षा कमी मार्क्सवाले. भारी कॉलेजला गेले, कारण आरक्षण होतं ना त्यांना. ३० हजारामध्ये टॉपचं कॉलेज, माझं मनच लागत नव्हतं. रात रातभर झोप येत नव्हती. स्वखुशीने हा निर्णय घेतला आहे, कुणालाही जबाबदार धरू नये, आपला प्रवीण (ड्रीम आयटी).

# मी कुठल्याही सभेत असं वक्तव्य केलं नाही
## बटेंगे तो कटेंगे वक्तव्यावरुन पंकजा मुंडेंचं स्पष्टीकरण

सांगली, (दिव्य न्युज):- राज्यातील विधानसभा निवडणुकीत भाजपच्या बटेंगे तो कटेंगे या घोषणेची जोरदार हवा सुरू आहे. मिरज विधानसभा मतदारसंघातील महायुती आणि भाजपचे उमेदवार आमदार सुरेश खाडे यांच्या प्रचारार्थ भाजप नेत्या पंकजा मुंडे यांची आयोजित करण्यात आली आहे. या सभेतून पंकजा मुंडेंनी बटेंगे तो कटेंगे या वक्तव्यावर भाष्य केलं. राजकारणामध्ये सगळ्या गोष्टी साध्य होत नाहीत, आपण सध्या बोलतोय एक, लिहतोय एक आणि मीडिया लगेच मागे लागते, सोशल मिडिया देखील खूप ताकदवान झालाय, असे म्हणत पंकजा मुंडेंनी बटेंगे तो कटेंगे या वक्तव्यासंदर्भात बोलण्याचे टाळले. सांगली जिल्ह्यातील मिरज विधानसभा मतदारसंघात आल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना पंकजा मुंडे यांनी त्यांच्या वक्तव्याबाबत स्पष्टीकरण दिलं. मी कोणत्याही सभेमध्ये असं वक्तव्य केलेलं नाही. प्रिंट मीडियामध्ये काय छापून आलं याच्यावर मी भाष्य अजिबात करणार नाही म्हणजे नाही, असे पंकजा मुंडे यांनी स्पष्ट शब्दात सांगितले.



मी भाजपची स्टार प्रचारक असल्याने विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने मोठ्या प्रमाणात माझ्या सभा होत असल्याने मला हटवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, असे म्हणत कटेंगे तो बटेंगे या विषयावरील वक्तव्यावर पंकजा मुंडे यांनी सावध पवित्रा घेतल्याचं पाहायला मिळत आहे. गेले पंधरा वर्षे मी राजकारणात काम करत आहे. गेल्या २५ दिवसांपासून मी सभा घेत आहे. २५ विधानसभा मतदारसंघात मी जे बोलले आहे तेच बघा. पेपर मध्ये काय छापून आलं याच्यावर मी अजिबात उत्तर देणार नाही म्हणजे नाही. या विषयावर मी कोठे बोललेले नाही. पण त्याने काय केलं हे माहीत नाही. माझा मुद्दा विकासाचा आहे. या मुद्द्यापासून मला हटवणं, तसेच माझ्या इतक्या सभा होत आहेत त्यापासून हटवण्यासाठी हे प्रयत्न आहे, असेही पंकजा यांनी म्हटले.

महाराष्ट्रात 'बटेंगे तो कटेंगे' अशा घोषणेची गरज नाही. माझ्या राजकारणाची पद्धत वेगळी आहे. केवळ मी भाजपमध्ये आहे म्हणून मी 'बटेंगे तो कटेंगे' या घोषणेचे समर्थन करणार नाही, असे परखड वक्तव्य भाजपच्या विधानपरिषदेच्या आमदार पंकजा मुंडे यांनी केल्याचं एका वर्तमानपत्रातून छापून आलय. पंकजा यांनी विधानसभेच्या प्रचाराच्यानिमित्ताने नुकतीच एका इंग्रजी दैनिकाला मुलाखत दिली होती. त्या मुलाखतमीध्ये पंकजा मुंडे यांनी 'बटेंगे तो कटेंगे' घोषणेबद्दल काहीशी नापसंती व्यक्त केली आहे. मात्र, मराठी माध्यमांशी बोलताना त्यांनी आपल्या वक्तव्याचा घुमजाव करत जास्त प्रतिक्रिया देणं टाळलं.

# शिंदेंच्या शिलेदाराचा 'करेक्ट कार्यक्रम' करण्यासाठी उद्धव ठाकरेंची भाजपला साद

मुंबई, (दिव्य न्युज):- गद्दाराच्या पापाचा घडा भरला आहे. मी त्याची चौकशी करून त्याला तुरूंगात डांबल्याशिवाय आणि येथील जनतेला भयमुक्त केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असा इशारा शिवसेना ( ठाकरे गट ) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे सिल्लोडचे आमदार अब्दुल सत्तार यांना दिला आहे.

अब्दुल सत्तार यांच्याविरोधातील ठाकरेंचे उमेदवार सुरेश बनकर यांच्यासाठी उद्धव ठाकरे यांची सिल्लोड येथे सभा पार पडली. यावेळी सत्तार यांचा करेक्ट कार्यक्रम करण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी भाजपला साद घातली आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले, सिल्लोडमधील गद्दारानं सुप्रिय सुळे यांना शिवीगाळ केली. याच माणसाच्या प्रचाराला देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी छत्रपती संभाजीनगर येथे आले होते. मला पंतप्रधान मोदींना विचारायचं आहे, हेच हेच तुमचं हिंदुत्त्व आहे का? हीच तुमची संस्कृती आहे का? लोकसभेला कर्नाटकात प्रज्ज्वल रेवण्णाचा मोदींनी प्रचार केला. या प्रज्वल रेवण्णानं काही हजार महिलांवर अत्याचार केले होते. अशा माणसाचा प्रचार नरेंद्र मोदी करण्यासाठी कर्नाटकात गेले होते.

# आता महाराष्ट्राला महिला मुख्यमंत्री मिळालेली पाहण्याची माझी इच्छा

पुणे, (दिव्य न्युज):- राज्यात दोन्ही आघाड्यांमधील घटक पक्षांमध्ये मुख्यमंत्रीपदासाठी जोरदार राजकीय चढाओढ सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. अशातच राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी महिला मुख्यमंत्री पाहण्याची इच्छा व्यक्त केल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. राज्याला पहिली महिला मुख्यमंत्री कधी मिळणार याबाबत सातत्याने चर्चा होत असते. राज्य स्थापनेपासून आजतागायत महाराष्ट्राला एकही महिला मुख्यमंत्री मिळालेली नाही, हा प्रश्नही अनेकदा उपस्थित केला जातो.

शिरूर तालुक्यातील वडगाव रासाई येथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार अशोक पवार यांच्या प्रचारसभेत बोलताना शरद पवार म्हणाले, राज्यात आमच्या सत्ताकाळात महिलांना ३० टक्के आरक्षण देण्याचा ऐतिहासिक निर्णय महाराष्ट्राने घेतला. त्यानंतर हा निर्णय देशभर लागू झाला. आज ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंत महिलांचा सहभाग वाढला आहे. आता महाराष्ट्राला महिला मुख्यमंत्री मिळालेली पाहण्याची माझी इच्छा आहे, असे त्यांनी सांगितले.

शरद पवारांनी यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मिश्कील शैलीत नक्कल केली. काही लोक बाहेरून येऊन सांगतात, 'घोडगंगा साखर कारखाना सुरू कसा होतो ते मी पाहतो.' तसेच लोकसभा निवडणुकीच्या वेळी एका नेत्याने अमोल कोल्हे निवडून येतो की नाही ते पाहतो, असे म्हटले होते. पण, लोकांनी आपली जबाबदारी ओळखत कोल्हे यांना लाखोंच्या मताधिक्याने निवडून दिले, असे सांगत त्यांनी अप्रत्यक्ष टोला लगावला.

सत्तेचा उपयोग जनतेच्या हितासाठी व्हायला हवा, असे सांगत शरद पवार यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली. घोडगंगा साखर कारखान्याला मंजूर असलेल्या कर्जाचे पैसे दिले जात नाहीत. बँकांनी कर्ज मंजूर करण्याची तयारी दाखवली असूनही, राज्य सरकारने अडथळे निर्माण केले आहेत. सहा इतर कारखान्यांना कर्ज मंजूर करण्यात आले, पण घोडगंगाला रोखण्यात आले. यामागे कोणाचा दबाव आहे हे लोकांनी समजून घेतले पाहिजे, असे ते म्हणाले.मुख्यमंत्र्यांकडे जाऊन कर्ज मिळवण्यासाठी प्रयत्न केला, तरीही परिस्थिती बदलली नाही, असेही पवार यांनी नमूद केले. राज्याच्या हिताला बाधा पोहोचवणाऱ्या अशा गोष्टींवर जनता नक्कीच विचार करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



पान १ वरून

### जनतेच्या मनावर

ते सर्वांना विश्वासात घेवून निर्णय घेतात. ज्येष्ठांचे मार्गदर्शन घेतात. एक तरुण लोकप्रतिनिधी किती व्यापक कार्य आपल्या मतदारसंघात करु शकतो याचे उदाहरण म्हणजे आ. संदीप भैय्या आहेत. त्यामुळे आपण सर्व मतदारांचे मत वाया जाणार नाही याचा विश्वास आम्हाला सर्वांना आहे, म्हणून येत्या २० नोव्हेंबरला आ. संदीप भैय्या क्षीरसागर यांना प्रचंड मतांनी विजयी करावे आणि बीड मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व विधानसभेत करण्याची पुन्हा एकदा संधी द्यावी असे आवाहन माजी आ. सय्यद सलीम यांनी यावेळी केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष व महाविकास आघाडी व मित्रपक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच शहरातील मतदार बहुसंख्येने उपस्थित होते.

### पोलीस अधीक्षकांच्या

त्यांच्याकडील रोख रकमेसह मोबाईल, गाड्या असा एकूण ४८ लाख १८ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीस अधीक्षकांच्या पथकाने केलेल्या या कारवाईमुळे अवैध धंद्यावाल्यांचे पुन्हा एकदा धाबे दणाणले आहेत.

### लिंबागणेश महावितरण

भागातील महावितरणच्या अनागोंदी कारभारामुळे ग्रामस्थ त्रस्त झाले असुन पावसाळ्यात वीज ग्राहकांना अखंडित व योग्य दाबाने वीजपुरवठा सातत्याने मिळावा म्हणून शहरी वग्रामीण भागातील वीजेची मान्सुनपुर्व देखभाल आणि दुरुस्तीची रोहित्रांची तपासणी,आर्थिंग व टर्मिनल कनेक्शन चेक करणे, सैल झालेले गार्डीग व स्पन घट्ट करणे,वीजतारांजवळील झाडांच्या फांद्याची छाटणी, लोंबकळणा-या तारांचे झोल काढणे तसेच उघड्यावरील रोहित्रांची सुरक्षितता ,रोहित्रांची तपासणी करून तेलाची योग्य पातळी राखणे,स्टे वायरने वीजखांबाचा आधार मजबूत करणे,पोल,वितरण पेट्या,फिडर पिलर्स,मिनी फिडर पिलर्स या सर्वांचे आर्थिंग सुस्थितीत करणे,फुटलेले पीन आणि इन्सुलेटर बदलणे इत्यादी कामे करणे आवश्यक आहे .मात्र कर्मचारी यांना नवीन काही वस्तू टाकण्यास सांगितले असता ते महावितरण कार्यालयात कुठलेही सामान उपलब्ध नाहीत असे उत्तरे देतात.

पान ४ वरून

### पाटोद्यात शनिवारी प्रदेशाध्यक्ष

आष्टी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार महेबुब शेख यांनी आष्टी विधानसभा मतदारसंघ पिंजून काढला असून युवक व सर्व सामान्य नागरिकांचा त्यांना मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. सदरील निवडणूक ही जनतेने हातात घेतली असल्याने महेबुब शेख यांचा विजय निश्चित झाला आहे. त्यांच्या प्रचारार्थ प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची पाटोदा येथे उद्या शनिवार सकाळी ९.३० वाजता बाजार तळ येथे जाहीर सभा होणार आहे. या सभेला प्रमुख पाहुणे म्हणून म्हणून खा. बजरंग सोनवणे यांची उपस्थिती राहणार आहे.आष्टी विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीच्या सर्व घटक पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व सर्वसामान्य नागरिक, युवक, महिला , शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष शिवभुषण जाधव व पदाधिकाऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

उद्या कोणत्या पक्षाला भगदाड पडणार याकडे लक्ष

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या आत्तापर्यंत आष्टी मतदारसंघात दोन सभा होत झाल्या असून यामध्ये प्रामुख्याने मा.जि.प.अध्यक्ष डॉ शिवाजी राऊत,सहकार महर्षी रामकृष्ण बांगर,तर दि.१५ नोव्हेंबर रोजी होत असलेल्या संसदरत्न खा.सुप्रियाताई सुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत युवानेतृव तरूणाईच्या गळ्यातील ताईत मा.जि.प.सदस्य सतिष आबा शिंदे प्रवेश करणार असल्याने उद्या होत असलेल्या प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या जाहिर सभेतून कोणत्या पक्षाला भगदाड पडणार यांची चर्चा सध्या मतदारसंघातुन करण्यात येत आहे.

### उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना

अध्यक्षतेखाली व युवासेना जिल्हा युवाधिकारी अभिषेकजी दिवे यांच्या उपस्थितीत आज माजलगाव शहरातील हॉटेल सुखसागर येथे माजलगाव विधानसभेतील वडवणी, धारूर, माजलगाव तिन्ही तालुक्यातील शिवसेना,युवासेना सह सर्व अंगीकृत संघटनांच्या आजी- माजी पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली.

या महत्त्वाच्या बैठकीमध्ये उपस्थित शिवसैनिकांशी संवाद साधताना शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव साहेब म्हणाले की शिवसेना हा एक परिवार असून आपण सर्वांना सोबत घेऊन कुटुंब म्हणून काम केले पाहिजे त्याचप्रमाणे शिवसैनिकांच्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने काही व्यथा व समस्या ऐकून घेतल्या व याप्रसंगी सर्व पदाधिकारी आणि शिवसैनिकांसमोर सांगितले की आपण बाळासाहेबांचे निष्ठावंत सैनिक असून आपण शिवसेनेचे पक्षप्रमुख सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशाचे पालन करून महाविकास आघाडी धर्म पाळून या ठिकाणचे उमेदवार मोहन दादा जगताप यांना निवडून द्यायचे आहे परंतु शिवसैनिकांचा व पदाधिकाऱ्यांचा व जिल्हाप्रमुखांचा सन्मान करून आघाडी धर्म जर मित्र पक्ष पाळत नसतील तर त्यांना त्यांची जागा दाखवावी लागेल. शिवसेनेचे पक्षप्रमुख यांच्या आदेशाचे सन्मानपूर्वक पालन करून यापुढे आपण काम करू असे त्याप्रसंगी सांगितले.

यावेळी उपस्थित सर्व शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक कार्यकर्त्यांच्या भावना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी ऐकून घेतल्या व आपल्या सर्व भावना मी आपल्या महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन दादा जगताप यांच्यासमोर मांडून शिवसैनिकांना व पदाधिकाऱ्यांना नक्कीच न्याय मिळवून देऊ व शिवसैनिकांचा योग्य तो सन्मान करण्याच्या सूचना देऊ व आपण सर्वांनी महाविकास आघाडी धर्माचे पालन करून महाविकास आघाडीचे उमेदवार मोहनदादा जगताप साहेब यांना माजलगाव मतदार संघाचे आमदार केल्याशिवाय शिवसेना शांत बसणार नाही परंतु येणाऱ्या काळातील शिवसेनेचा योग्य तो सन्मान करून येणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुका, पंचायत समिती निवडणुका, नगरपंचायत निवडणुका यामध्ये पण महाविकास आघाडीचा धर्म पाळून शिवसैनिकांना व शिवसेनेला मित्र पक्षाने साथ दिली पाहिजे ही सुद्धा अपेक्षा व्यक्त केली व याप्रसंगी बोलताना असे सांगितले की बीड जिल्ह्यामध्ये महाविकास आघाडीच्या एकूण सहा जागा लढवल्या जात आहेत त्यापैकी पाच जागा राष्ट्रवादीला व एक जागा शिवसेनेला सुटलेली आहे त्यामुळे गेवराई येथे शिवसेना आणि महाविकास आघाडीचे उमेदवार बदामरावजी आबा पंडित साहेब यांना सर्वांनी सहकार्य करून आमच्या उमेदवाराला निवडून देण्याचे काम करावे असेही याप्रसंगी नमूद केले.